**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३०४/२०२३</u>**
(CNR No.MHSO220048142023)

## निशाणी क्र.५३ वरील आदेश

(सौ.कोंडाबाई बडे वगैरे वि. सर्जेराव नागरगोजे वगैरे)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

वादीचे कथन असे की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादींनी वादी – प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबातील व वाडवडिलार्जित दावा कलम १(अ) व १(ब) या जमिनी दाव्यात समाविष्ट केलेल्या आहेत. मात्र वादी यांना दावा दाखल करतेवेळी वादी प्रतिवादी यांची वाडवडिलार्जित व एकत्र कुटुंबाची मौजे लिंबेवाडी या ठिकाणी घरजागा असून सदर घरजागेबाबत माहिती नसल्यामुळे दावा दाखल करतेवेळी दाव्यामध्ये समाविष्ट करणेचे राहून गेलेले आहे. दावा हा मिळकतीचे सरस– निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठीचा असलेमुळे कायद्याने वादी व प्रतिवादी एकत्र हिंदू कुटुंबातील व वाडवडिलार्जित सर्व मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट करणे कायद्याने गरजेचे आहे. करीता त्यामुळे प्रस्तुत दाव्यात अर्ज परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदरची मिळकत दाव्यात समाविष्ट केलेने दावा गुणावगुणावर चालविणेस मदत होणार आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रतिवादी क्र.७ तर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले. इतर प्रतिवादींनी म्हणणे दाखल केले नाही. वादीचा अर्ज मुळातच कायदेशीर नाही. वादीस घरजागेची माहिती नव्हती हे म्हणणे खोटे आहे. वादींनी सदर बाबतीत खुप विलंबाने दुरुस्ती मागितली आहे. तसेच घर जागेत बहिणींना हिस्सा मागता येणार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली.

३.	अर्ज, अर्जावरील म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा सरस–निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठीचा आहे. प्रस्तुत दाव्यात वाद मुद्दे दिनांक २० नोव्हेंबर २०२१ रोजी निश्चित केलेले आहे. तद्नंतर सदरचे प्रकरण वादीचे पुराव्याकामी लावणेत आले होते. वादीने निशाणी ३७ वर सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रकरण वादीचे उलटतपासासाठी आहे. वादीने सदरचा अर्ज देवून वादी, प्रतिवादी यांची वडिलार्जित व एकत्र कुटुंबाची मौजे लिंबेवाडी याठिकाणीची घरजागा दाव्यामध्ये समाविष्ट करणेचे विनंती केली. वादीच्या सदरच्या कृत्यामुळे प्रतिवादीस मानसिक भार सोसावा लागला आहे. नियोजित दुरुस्ती ही दाव्याचे मुळे स्वरुपात कोणत्याही प्रकारे बदल करत नाही. त्याचवेळी नियोजित दुरुस्तीमुळे दावा हा गुणवत्तेवर निकाली निघण्याकामी उभय पक्षकारांना सोयीस्कर ठरणार आहे. विलंब हा काही अंशी वादीच्या कृतीमुळे झालेला विलंबास अनुसरुन वादीवर आर्थिक भुर्दंड लादल्यास थोड्या प्रमाणात का होईना कमी होईल, त्यामुळे एकंदरीत प्रकरणात उद्भवलेली स्थिती व वादीच्या वतीने करण्यात येणारी नियोजित दुरुस्ती ही उभय पक्षकारांचा वाद हा गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी गरजेचे आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१.	अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.	वादीने प्रतिवादीस रु.३००/– दंडाची रक्कम द्यावी.

३.	वादीने अर्जात सुचवलेली दुरुस्ती विहीत मुदतीत करुन दुरुस्त दाव्याची प्रत देखील विहीत मुदतीत दाखल करावी.

SANJAY MOTIRAM GHUGE Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE Date: 2025.06.17 17:15:00 +0530

( एस. एम. घुगे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
करमाळा, जि.सोलापूर

स्थळ – करमाळा.
दिनांक – १७.०६.२०२५.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Karmala |
| Date | : | 17.06.2025 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 17.06.2025 |
| Order uploaded on | : | 17.06.2025 |